संक्षिप्त

नाट्य स्पर्धेतील विजेत्यांचा आज सन्मान

नाशिक : राज्य शासनाच्या सांस्कृतिक कार्य संचालनालयाच्या वतीने २३ जुलै रोजी सायंकाळी साडे सहा वाजता हौशी मराठी नाट्य आणि बालनाट्य स्पर्धेतील पारितोषिक विजेत्या कलाकारांचा सन्मान समारंभ महाकवी कालिदास कलामंदिर येथे आयोजित करण्यात आला आहे. ६२ वी महाराष्ट्र राज्य हौशी मराठी नाट्य स्पर्धा आणि २० व्या महाराष्ट्र राज्य बालनाट्य स्पर्धेच्या प्राथमिक फेरीतील पारितोषिक विजेत्या कलाकारांचा सन्मान करण्यात येणार आहे. अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेच्या नाशिक शाखेचे अध्यक्ष व अन्य पदाधिकारी यावेळी उपस्थित राहणार आहेत. प्रवेश सर्वांना खुला आहे.

'लाडकी बहीण' अर्ज जमा करण्याचे आवाहन

नाशिक : 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजनेचे भरलेले अर्ज महानगरपालिकेने या योजनेसाठी स्थापलेल्या ३९ मदत केंद्रावर जमा करावेत, असे आवाहन मनपाच्या वतीने करण्यात आले आहे. लाभार्थींनी भरलेले अर्ज लोकप्रतिनिधी, विविध पक्षांचे पदाधिकारी, स्वयंसेवी संस्था यांनी संकलित केले असतील तर ते आपल्या भागातील मनपाच्या केंद्रावर जमा करण्यास सांगण्यात आले आहे. जेणेकरून अर्ज जमा केलेल्या महिलांना योजनेचा लाभ देण्याच्यादृष्टीने अर्ज पडताळणी करता येईल. १९ जुलैपर्यंत २२ हजार १३८ महिलांचे अर्ज मनपाच्या ३९ मदत केंद्रावर दाखल करून घेण्यात आले आहेत. शहरातील महिलांनी या योजनेचा लाभ घेण्यासाठी मनपाच्या मदत केंद्रावर अर्ज दाखल करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

'नाएसो'तर्फे शिक्षकांसाठी इंग्रजी प्रशिक्षण

नाशिक : नाशिक एज्युकेशन सोसायटी आणि नवनीत फाउंडेशन यांच्या सहकार्याने प्राथमिक शिक्षकांसाठी इंग्रजी प्रशिक्षण शिबीर पेठे विद्यालयाच्या सभागृहात घेण्यात आले. सागरमल मोदी विद्यालयातील सर्व शिक्षकांनी सहभाग नोंदवला. दिवसभराच्या प्रशिक्षणात इंग्रजीचा वापर वर्गामध्ये कशा पद्धतीने करावा, संभाषण कसे करावे, सूचना कशा द्याव्यात, इंग्रजी विषयाचे महत्त्व, याविषयी मार्गदर्शन प्रशिक्षक प्रा. रंगनाथ भवर, प्रा.पुरुषोत्तम ठोके यांनी केले. कृतीयुक्त आधारित प्रशिक्षण शिक्षकांना भावले. शिबीर उद्घाटनप्रसंगी संस्था कार्यवाह राजेंद्र निकम, सागरमल मोदी प्राथमिक शाळेच्या शालेय समिती अध्यक्ष रंजना परदेशी, नवनीत एज्युकेशनचे नाशिक जिल्हाप्रमुख सुनील वाघ, संस्था सहकार्यवाह शैलेश पाटोळे,विजय मापारी आदी उपस्थित होते.

अभियानासाठी समन्वय गरजेचा

पालकमंत्री दादा भुसे यांच्या उपस्थितीत अधिकाऱ्यांची आढावा बैठक

लोकसत्ता वार्ताहर

मालेगाव तालुक्यातील काष्टी येथे आयोजित बैठकीत मार्गदर्शन करताना पालकमंत्री दादा भुसे.

मालेगाव : तालुक्यात शासनाच्या विविध योजनांचा स्थानिक स्तरावर व एकाच ठिकाणी लाभ उपलब्ध करुन देण्यासाठी महाराजस्व तसेच सर्वरोग निदान आणि उपचार उपलब्ध करून देण्यासाठी महाआरोग्य अभियान राबविण्यात येणार आहे. १५ ऑगस्टपूर्वी राबविण्यात येणारे हे दोन्ही अभियान यशस्वी करण्यासाठी सर्व यंत्रणांनी समन्वयाने काम करावे, असे निर्देश पालकमंत्री दादा भुसे यांनी दिले.

तालुक्यातील काष्टी येथील आनंद आश्रमात महाराजस्व आणि महाआरोग्य शिबीर राबविण्यासाठी पूर्वतयारी म्हणून भुसे यांनी सोमवारी विविध विभागांच्या अधिकाऱ्यांची बैठक घेतली. या बैठकीस भुसे यांनी मार्गदर्शन केले. यावेळी अप्पर जिल्हाधिकारी देवदत्त केकाण, महापालिका आयुक्त रवींद्र जाधव,अप्पर पोलीस अधीक्षक अनिकेत भारती,आरोग्य उपसंचालक डॉ. कपिल आहेर, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. चारुदत्त शिंदे यांच्यासह विविध विभागाचे अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते. शासनाच्या विविध विभागांच्या योजनांचा लाभ घेण्याकरिता तसेच त्यासंबंधी माहिती किंवा मार्गदर्शन मिळविण्यासाठी नागरिकांना विविध कार्यालयात हेलपाटे मारावे लागतात. ही अडचण टाळण्यासाठी महाराजस्व अभियान राबविण्यात येत असून त्या माध्यमातून विविध कामांसाठी लागणारी आवश्यक प्रमाणपत्रे, दाखले व योजनांचा लाभ, सेवा एकाच ठिकाणी उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. त्या अनुषंगाने नागरिकांना या अभियानाच्या माध्यमातून जागेवरच आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करुन योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी संबंधित विभागांनी आवश्यक ती कार्यवाही करावी,अशी सूचना भुसे यांनी बैठकीत केली.

विविध योजनांच्या माध्यमातून नागरिकांना अधिकाधिक चांगल्या दर्जाच्या वैद्यकीय सुविधा देण्यासाठी शासन कटिबध्द आहे. त्याअनुषंगाने तालुक्यातील नागरिकांना तज्ज्ञांच्या उपस्थितीत एकाच ठिकाणी विशेष वैद्यकीय सेवा मिळण्यासाठी महाआरोग्य अभियानाचे आयोजन करण्यात येत आहे. या अभियानाच्या माध्यमातून नागरिकांना वैद्यकीय सुविधेचा प्रत्यक्ष लाभ देण्यात येईल. संबंधित विभागांनी प्रलंबित प्रकल्प आणि प्रकरणांचा तत्काळ निपटारा करावा, आदिवासी तसेच अपंग बाधवांना देण्यात येणारे विविध दाखले वेळीच वाटप करावेत, ऑनलाईन रेशन कार्डची कार्यवाही तातडीने करावी, मालेगाव महानगरपालिकेने प्लास्टिक निर्मूलनाची कार्यवाही करावी, सर्व विभागांनी आपल्या कार्यालयाचा परिसर स्वच्छ करुन ह्यएक पेड माँ के नाम' योजनेंतर्गत वृक्ष लागवड करावी, लाभार्थ्यांची यादी तत्काळ संबंधित विभागाकडे जमा करावी, अशा सूचनाही भुसे यांनी केल्या. संबंधित अधिकाऱ्यांनी आपआपल्या विभागाकडून राबविण्यात येणाऱ्या योजनांची व अभियानात नागरिकांना देण्यात येणाऱ्या प्रत्यक्ष सेवांची सविस्तर माहिती सादर केली. प्रास्ताविक प्रांताधिकारी नितीन सदगीर यांनी केले.

पालकमंत्र्याच्या सूचना

बैठकीत पालकमंत्री दादा भुसे यांनी विविध सूचना केल्या. अभियानाच्या माध्यमातून वैद्यकीय सुविधेचा लाभ देण्यासाठी संबंधित विभागांनी प्रलंबित प्रकल्प आणि प्रकरणांचा तत्काळ निपटारा करावा, आदिवासी तसेच अपंग बाधवांना देण्यात येणारे विविध दाखले वेळीच वाटप करावेत, ऑनलाईन रेशन कार्डची कार्यवाही तातडीने करावी, मालेगाव महानगरपालिकेने प्लास्टिक निर्मूलनाची कार्यवाही करावी, सर्व विभागांनी 'एक पेड माँ के नाम' योजनेंतर्गत वृक्ष लागवड करावी, लाभार्थ्यांची यादी संबंधित विभागाकडे जमा करावी, अशा सूचना केल्या.

मोटारीच्या धडकेत पादचाऱ्याचा मृत्यू

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

नाशिक : नाशिक-पुणे रस्त्यावरील हॉटेल विसावा परिसरात भरधाव मोटारीची धडक बसल्याने ५८ वर्षाच्या पादचाऱ्याचा मृत्यू झाला. अपघातानंतर मोटारचालक वाहनासह पसार झाला.

विनोदप्रसाद जैन (रा.मूळ हरियाणा, हल्ली चौधरी बिल्डर्स, पळसे, नाशिक) असे मृत व्यक्तीचे नाव आहे. जैन हे रविवारी पळसे येथील विसावा हॉटेल भागात गायींना नैवेद्य दाखविण्यासाठी गेले होते. तेथून परतत असताना भरधाव मोटारीची त्यांना धडक बसली. या अपघातात जैन हे गंभीर जखमी झाले. सविता गवळी यांनी त्यांना तातडीने जिल्हा रुग्णालयात दाखल केले. परंतु, तत्पूर्वीच त्यांचा मृत्यू झाल्याचे वैद्यकीय अधिकाऱ्यांनी घोषित केले. अपघातानंतर चालक आपल्या वाहनासह फरार झाला. याबाबत पोलीस नाईक अनिल पवार यांनी दिलेल्या तक्रारीनुसार नाशिकरोड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दुचाकीची जाळपोळ

घरासमोर उभी केलेली दुचाकी समाजकंटकांनी ज्वलनशील पदार्थ टाकून पेटवून दिल्याची घटना टाकळी रस्ता भागात घडली. यात दुचाकीचे मोठे नुकसान झाले. याबाबत खर्जुल मळा येथील रहिवासी आरती शिंदे यांनी तक्रार दिली. शिंदे यांची दुचाकी रविवारी रात्री त्यांच्या घरासमोर उभी होती. समाजकंटकांनी ज्वलनशील पदार्थ टाकून ती पेटवून दिली. या घटनेत दुचाकीचे मोठे नुकसान झाले. हा प्रकार वेळीच लक्षात आल्याने मोठा अनर्थ टळला. या प्रकरणी उपनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

गुन्हे वृत्त

मंगळसूत्र खेचले

सोसायटीचा दरवाजा उघडत असताना दुचाकीस्वार चोरट्यांनी महिलेच्या गळ्यातील मंगळसूत्र खेचून नेले. वडाळा-पाथर्डी मार्गावरील बाटली कारखाना परिसरात ही घटना घडली. याबाबत चंदा दुंदाले (मीनाक्षी हाईटस, शिव कॉलनी) यांनी तक्रार दिली. दुंदाले या वडाळा-पाथर्डी रस्ता भागात राहणाऱ्या आपल्या नणंदच्या घरी गेल्या होत्या. सोसायटीचा दरवाजा उघडत असताना दुचाकीवर आलेल्या चोरट्यांनी त्यांच्या गळ्यातील सुमारे २१ हजार रुपयांचे मंगळसूत्र हिसकावून नेले. या प्रकरणी इंदिरानगर पोलीस ठाण्यात जबरी चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

उधारीचे पैसे मागितल्याने हल्ला

उधारीचे पैसे मागितल्याने टोळक्याने उसळ विक्रेत्यास मारहाण केल्याची घटना नाशिकरोड येथे घडली. यावेळी शस्त्राचाही वापर करण्यात आल्याने विक्रेता जखमी झाला. याबाबत संदीप शिंदे (२६, अरिंगळे मळा, एकलहरेरोड) या युवकाने तक्रार दिली. बादशहा शेख, रिझवान, अजय लोंढे व गणू अशी गुन्हा दाखल करण्यात आलेल्या संशयितांची नावे असल्याचे पोलीस सूत्रांनी सांगितले. शिंदे यांचा उसळ विक्रीचा व्यवसाय आहे. नाशिकरोड येथील चामुंडा कलेक्शनजवळ शिंदे आपला व्यवसाय करीत होते. तेव्हा बादशाह आणि त्याचा मुलगा रिझवान यांनी उसळ खरेदी केली. यावेळी शिंदे यांनी उधारीच्या ४० रुपयांची मागणी केल्याने वाद झाला. संतप्त बापलेकाने शिवीगाळ करीत शिंदे यांना मारहाण केली. यावेळी रिझवानने आपल्या दोन साथीदारांना बोलावून घेत धारदार हत्याराने शिंदे यांच्यावर वार केले. या घटनेत शिंदे जखमी झाले. या प्रकरणी नाशिकरोड पोलीस ठाण्यात चार जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मनमाड पोलिसांची दंगल नियंत्रण तालीम

लोकसत्ता वार्ताहर

मनमाड : शहरातील कायदा आणि सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी तसेच आगामी काळातील सणोत्सव आणि विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर, पोलीस कवायत मैदानावर अधिकारी, कर्मचाऱ्यांनी रंगीत तालीम केली. दंगलीच्या काळात अथवा प्रक्षुब्ध जमावाला नियंत्रित करण्याचा सराव पोलिसांनी केला.

या माध्यमातून पोलीस प्रशासन कोणतीही परिस्थिती हाताळण्यास सज्ज असल्याचे अधोरेखीत करण्यात आले. यावेळी सादर झालेल्या थरारक प्रात्यक्षिकांनी उपस्थितांना थक्क केले. ग्रामीण पोलीस अधीक्षक विक्रम देशमाने, अप्पर अधीक्षक अनिकेत भारती यांच्या आदेशान्वये मनमाड विभागाचे उपअधीक्षक बाजीराव महाजन यांच्या मार्गदर्शनाखाली मनमाड पोलीस कवायत मैदानावर दंगल नियंत्रण पथक व मनमाड शहर पोलीस ठाणे यांच्यातर्फे तालीमचे आयोजन करण्यात आले होते. त्यामध्ये निरीक्षक अशोक घुगे, सहायक निरीक्षक कौशल वाघ, उपनिरीक्षक प्रमोद सरोवर, उपनिरीक्षक दिलीप बोडके, पोलीस अधिकारी, कर्मचारी आणि विशेष पोलीस पथकाने सहभाग घेतला.

प्रात्यक्षिकात अधिकाऱ्यांसह ३७ कर्मचारी, आठ महिला पोलीस, नगरपालिकेचे अग्निशमन पथक सहभागी झाले होते.

तारा बोराडे यांचे निधन

नाशिक : नाशिकरोड येथील रहिवासी तारा तुकाराम बोराडे (६६) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले.

त्यांच्या पश्चात पती, मुलगा राहुल, दोन मुली, सून, नातवंडे असा परिवार आहे. महानगरपालिकेचे माजी उपअभियंता तुकाराम बोराडे यांच्या त्या पत्नी होत.

बासरी वादनाने सूरविश्वास कुमार मंचचा शुभारंभ

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

नाशिक : शहरातील विश्वास ग्रुप आणि महाराष्ट्र साहित्य परिषदेची जलालपूर शाखा यांच्यातर्फे स्थापित सूरविश्वास कुमारमंचचा शुभारंभाप्रसंगी विद्यार्थ्यांनी गणेश वंदना, शास्त्रीय गायन, समूह बासरी वादनाने आपले कौशल्य अधोरेखीत केले.

सुरविश्वास कुमारमंचचा शुभारंभ प्रसिद्ध गायक पंडित डॉ. अविराज तायडे यांच्या प्रमुख उपस्थितीत सावरकरनगर येथील विश्वास बँक आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण केंद्राच्या सभागृहात झाला. यावेळी डॉ. तायडे यांनी विद्यार्थ्यांना शास्त्रीय संगीत, गायन-वादन सादरीकरणाचे व्यासपीठ निर्माण करणे म्हणजेच संपन्न समृद्ध समाजाचा कृतीशील विचार असल्याचे प्रतिपादन केले. विश्वास ग्रुपचे प्रमुख विश्वास ठाकूर यांनी मुलांच्या अंगभूत गुणांना व्यासपीठ देण्यासाठी, दिशा देण्यासाठी कुमार मंचचा उपक्रम आनंद देणारा व त्यांची उमेद वाढवणारा ठरेल, असा विश्वास व्यक्त केला. मंचचे संकल्पक विनायक रानडे यांनी समाजातील उत्तमाचा ध्यास घेऊन सांस्कृतिक संचित जोपासण्याचे काम विश्वास ग्रुपच्या माध्यमातून सातत्याने होत असल्याचे सांगितले. सूत्रसंचालन डॉ. स्मिता मालपुरे यांनी केले. कार्यक्रमाची सुरूवात अवनी कुलकर्णी, आर्या देशपांडे, अद्विका चंद्रात्रेय या विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या गणेशवंदनाने झाली.

भावभक्तीची अनुभूती

ज्ञानेश्वर कासार यांच्या शिष्या आर्या कापूरेने राग सरस्वती सादर केला. सुरज बारी (संवादिनी), स्वानंद देशमुख (तबला) यांनी साथ संगत केली. समूह बासरी वादन मोहन उपासनी यांच्या शिष्यांनी, तबला सहवादन सौरभ क्षीरसागर यांच्या शिष्यांनी केले. सामूहिक शास्त्रीय गायन सिद्धार्थ निकम यांच्या शिष्यांनी केले.

कळवण 'आयटीआय'ला शासनाचा सर्वोत्कृष्टतेचा पुरस्कार

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

संस्थेने आदिवासी प्रशिक्षणार्थींना परिसरातील विविध औद्योगिक आस्थापनांमध्ये काम करताना प्रशिक्षण तसेच उत्तीर्ण झाल्यानंतर शिकाऊ उमेदवारीच्या संधी उपलब्ध करुन देत रोजगार स्वयंरोजगार सुरू करण्यासाठी सक्षम केले.

नाशिक : जागतिक कौशल्य दिनाचे औचित्य साधून कळवण येथील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचा (आयटीआय) नाशिक विभागातील उत्कृष्ट आयटीआय म्हणून गौरव करण्यात आला. आदिवासी भागात तांत्रिक शिक्षणाची प्रभावीपणे अंमलबजावणी केल्याबद्दल मुंबईतील एल्फिस्टन हायस्कुल येथे झालेल्या कार्यक्रमात आयटीआयचा सन्मान करण्यात आला.

एक लाख रुपयांचा धनादेश व मानचिन्ह असे नाशिक विभागातील उत्कृष्ट आयटीआय प्रथम क्रमांकाच्या पारितोषिकाचे स्वरुप आहे. संस्थेचे प्राचार्य सतीश भामरे यांनी ही माहिती दिली. कार्यशाळेतील यंत्रसामग्रीची मांडणी, रचना, हरित परिसर, प्रशिक्षणार्थींसाठी सुसज्ज प्रात्यक्षिक प्रयोगशाळा, आभासी वर्ग (व्हर्च्युअल क्लासरुम), ग्रंथालय, अभ्यासिका यासारख्या सुविधा आदी मानके उत्कृष्ट आयटीआय प्रथम क्रमांकाचे पारितोषिक देताना तपासण्यात आली. संस्थेने आदिवासी प्रशिक्षणार्थींना परिसरातील विविध औद्योगिक आस्थापनांमध्ये काम करताना प्रशिक्षण तसेच उत्तीर्ण झाल्यानंतर शिकाऊ उमेदवारीच्या संधी उपलब्ध करुन देत रोजगार स्वयंरोजगार सुरू करण्यासाठी सक्षम केले. त्या अनुषंगाने केंद्रीय सामाजिक न्याय व अधिकार राज्यमंत्री रामदास आठवले, कौशल्य रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाचे मंत्री मंगलप्रभात लोढा, कौशल्य विभागाच्या आयुक्त निधी चौधरी, कुलगुरु अपूर्वा पालकर, सचिव गणेश पाटील, संचालक दिगंबर दळवी यांच्या हस्ते नाशिक विभागातील उत्कृष्ट आयटीआय म्हणून प्रथम क्रमांकाचे पारितोषिक संस्थेचे प्राचार्य भामरे, गटनिदेशक राहुल विभांडिक यांनी स्वीकारले. यावेळी शिल्पनिदेशक संदीप चव्हाण, वरिष्ठ लिपिक विद्या पोतदार उपस्थित होते.

पारितोषिकासाठी मानकांची तपासणी

नाशिक विभागातील उत्कृष्ट आयटीआय असे प्रथम क्रमांकाचे पारितोषिक मिळविणाऱ्या कळवण आयटीआयने हे यश मिळविण्यासाठी अनेक उपक्रम राबविले. या पारितोषिकासाठी मानकांची तपासणी करण्यात आली. कार्यशाळेतील यंत्रसामग्रीची मांडणी, रचना, हरित परिसर, प्रशिक्षणार्थींसाठी सुसज्ज प्रात्यक्षिक प्रयोगशाळा, आभासी वर्ग (व्हर्च्युअल क्लासरुम), ग्रंथालय, अभ्यासिका यासारख्या सुविधा आयटीआयमध्ये आहेत की नाहीत, हे पाहण्यात आले. या सर्व मानकांमध्ये कळवण आयटीआय उत्तीर्ण झाली. याशिवाय या आयटीआयची स्वतःची अशी काही वैशिष्ट्ये आहेत. संस्थेने आदिवासी प्रशिक्षणार्थींना परिसरातील विविध औद्योगिक आस्थापनांमध्ये प्रशिक्षण तसेच उत्तीर्ण झाल्यानंतर शिकाऊ उमेदवारीच्या संधी उपलब्ध करुन दिल्या.

अॅक्सिस बँक लि.

शाखा कार्यालय : रिटेल अॅसेट सेंटर,१ ला मजला, माझदा टॉवर्स, त्र्यंबक नाका, जिल्हा परिषदेसमोर, जीपीओ रोड, नाशिक-४२२००१.
कॉर्पोरेट ऑफिस : ॲक्सिस हाऊस, सी-२, वाडिया इन्टरनॅशनल सेंटर, पांडुरंग बुधकर मार्ग, वरळी, मुंबई- ४०००२५.
नोंदणीकृत कार्यालय : त्रिशुल ३रा महला, समर्थेश्वर मंदिरासमोर, लॉ गार्डन, एलीसब्रीज अहमदाबाद - ३८०००६.

स्थावर मालमत्तेच्या विक्रीसाठी लिलाव विक्री सूचना

सिक्युरिटायझेशन अॅण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल अॅसेटस् अॅण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अॅक्ट २००२ आणि त्यासह सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स मधील रुल ८(६) सह अटींनुसार स्थावर मिळकतीच्या विक्रीकरिता लिलावाच्या विक्रीची जाहीर सुचना

तमाम जनतेस, खासकरुन कर्जदार, सह-कर्जदार, जामीनदार आणि गहाणदार यांना ही जाहीर नोटीस देण्यात येते की, खाली नमूद केलेली चल व अचल मिळकत जी सुरक्षित धनको (सिक्युअर्ड क्रेडीटर) यांच्याकडे गहाण/बोज्या अंतर्गत आहेत आणि अधिकृत अधिकारी यांनी या मालमत्तांचा **प्रत्यक्ष ताबा** घेतला असुन सुरक्षित धनको यांचे अधिकृत अधिकारी यांनी बँकेला येणे असलेली रक्कम वसूल करण्यासाठी खाली नमूद केलेल्या मालमत्तांची **''जसे आहे, जेथे आहे तेथे '' ''जशी आहे तशी आणि जे काही आहे ते आणि कोणत्याही फेरविचाराविना** या तत्त्वावर खाली नमूद केलेल्या तारखांना विक्री करण्यात येत आहे. राखीव किंमत आणि बयाणा रक्कम इ. खाली नमूद केल्यानुसार आहे. कृपया लिलावाच्या तपशीलासाठी खालील परिशिष्टाचा संदर्भ घ्यावा.

लिलावाचे परिशिष्ट आणि कर्जाचा तपशील

कर्जदार / जामीनदार / गहाणदार यांची नावे आणि पत्ता	**१) श्री. मिलिंद लहानु शिंदे, २) सौ. राजश्री राधाकिसन सुरसे, दोन्ही रा.** गंगासागर रो हाउस नं.२९, स्वामी समर्थ नगर, सेंट लॉरेन्स स्कूल समोर, सिडको कॉलनी, महाराष्ट्र, भारत - ४२२००९, **तसेच :** शिवसाई एंटरप्रायझेस, मु/पो गोंडे, ता. इगतपुरी, जिल्हा.नाशिक- ४२२४०३, **तसेच :** फ्लॅट नं.२९, पाचव्या मजल्यावर, विंग बी., ओम अपार्टमेंट, प्लॉट नं.१+२, सर्व्हे नं.१३५/१, सरुल रोड, मुंबई-आग्रा हायवे, विल्होली, ता.आणि जिल्हा.नाशिक- ४२२०१०.
मालमत्तेचा तपशील	मालमत्तेचे सर्वसामाईक भाग, फ्लॅट नं.२९, पाचव्या मजल्यावर, विंग बी, ओम अपार्टमेंट, कार्पेट एरिया २२.८६ चौ. मीटर, संलग्न बाल्कनी १.७४ चौ. मीटर + बाल्कनी २.६५ चौ. मीटर, प्लॉट नं.१+२, सर्व्हे नं.१३५/१, सरुल रोड, मुंबई-आग्रा हायवे, विल्होली ता. जिल्हा.नाशिक-४२२०१०. आणि चतु:सीमा बिल्डिंग प्लॅन नुसार.
राखीव किंमत आणि ईएमडी	**राखीव किंमत : रु. ८,८०,९००/- (रुपये आठ लाख ऐंशी हजार नऊशे फक्त)** **ईएमडी : रु. ८८,०९०/- (रुपये अठ्ठ्याऐंशी हजार नव्वद फक्त) 'ॲक्सीस बँक लि.,'** च्या नावे काढलेल्या **नाशिक** येथे देय डिमांड ड्राफ्ट द्वारा.
माहित असलेला बोजा	माहीती नाही. वीज, देखभाल, कर, बिल्डरची देणी इत्यादीसाठी न भरलेले शूल्क, लागू असल्यास
बोली वाढविण्याची किंमत	रु. १०,०००/-(दहा हजार रुपये फक्त)
मोहोरबंद प्रस्ताव बयाणा रक्कमेसहीत निविदा सादर करण्याची अंतिम तारीख, वेळ आणि स्थळ	**दि. २३/०८/२०२४, पर्यंत सायं ०५.०० वा. ॲक्सीस बँक लि.,रिटेल असेट सेंटर, १ ला मजला, माझदा टॉवर्स, त्र्यंबक नाका, जिल्हा परिषदेसमोर, जीपीओ रोड, नाशिक-४२२००१.**
बोली उघडण्याची तारीख व वेळ	**दि. २६/०८/२०२४, रोजी दु. १२.०० ते दु ०१.०० वा.** वेब पोर्टल **https://www.bankeauctions.com** वर < प्रत्येकी ५ मिनिटांच्या अमर्याद विस्तारासह, ई-लिलाव निविदा दस्ताऐवज ज्यामध्ये ई-लिलाव बोली फॉर्म, घोषणा, इ. वर नमूद केल्याप्रमाणे सेवा प्रदात्याच्या वेबसाइटवर उपलब्ध आहे
मालमत्तेच्या पाहणी	**संपर्क : ॲक्सीस बँक लि.,रिटेल असेट सेंटर, १ ला मजला, माझदा टॉवर्स, त्र्यंबक नाका, जिल्हा परिषदे-समोर, जीपीओ रोड, नाशिक-४२२००१. कार्यालयीन वेळेत सकाळी ९.३० ते सायं ५.०० वा. कामाच्या दिवसात.**
निविदा प्रस्ताव तथा ऑक्शन फॉर्मची किंमत	रु.२५०/- डी.डी./पे ऑर्डर नाशिक येथे देय असलेल्या ''ॲक्सीस बँक लि.,'' च्या नावे.
अयशस्वी प्रस्तावकांची बयाणा रक्कम परत करण्याची वेळ	लिलावाच्या तारखेपासून कामकाजाच्या ७ दिवसांच्या आत.
निश्चित करण्यात आलेल्या उच्चतम प्रस्तावकाकडून २५% रक्कम जमा करण्याची अंतिम तारीख बयाणा रक्कमेसहित	बिड पुष्टीकरणाच्या तारखेपासून पुढील कामकाजाच्या दिवसापर्यंत पेमेंट केले जावे.
उच्चतम प्रस्तावकाची उर्वरित ७५% रक्कम जमा करण्याची अंतिम तारीख	बोली/विक्री पुष्टीकरणाच्या तारखेपासून १५ दिवसांच्या आत.
सरफेसी ॲक्टच्या सेक्शन १३(२) अंतर्गत मागणी नोटिसीची तारीख	**दि. २१/०१/२०२३**
सरफेसी ॲक्टच्या सेक्शन १३(२) अंतर्गत मागणी नोटिसीची रक्कम रुपयांमध्ये	**रु. ९,८२,०५२/- (रुपये नऊ लाख ब्याऐंशी हजार बावन्न फक्त) दि. १२/०१/२०२३** रोजी येणे असलेली आणि (**दि. १२/०१/२०२३** पर्यंतचे लागु केलेले व्याज आणि दंडात्मक व्याजासहीत) त्यावरील **दि. १२/०१/२०२३** पर्यंत करारानुसार होणारे सदर रक्कम परत करेपर्यंतचे व्याजासहीत.
प्रत्यक्ष ताबा घेतल्याची तारीख	**दि. ०४/०७/२०२४**
ताबा नोटीस प्रसिध्द करण्यात आल्याची तारीख	**दि. ०९/०७/२०२४**

कर्जदार/सहकर्जदार/जामीनदार यांना या नोटीसद्वारे सूचना देण्यात येते कि, त्यांनी बोली उघडण्याच्या तारखेपूर्वी बँकेला येणे असलेली सर्व रक्कम भरावी, अन्यथा सुरक्षित मालमत्तांची लिलावाद्वारे विक्री करण्यात येईल आणि जर काही उर्वरित रक्कम असल्यास आपल्याकडून त्याची व्याज व खर्चासह वसुली करण्यात येईल. तसेच हि सूचना सेक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स २००२ च्या नियम ८(६) सह अंतर्गत कर्जदार/सहकर्जदार/जामीनदार यांच्यासाठी **३० दिवसांची** नोटीस समजावी.

विक्रीसंबंधित तपशीलवार अटी व शर्तींसाठी कृपया सुरक्षित धनकोची वेबसाईटवरील लिंक म्हणजेचे https://www.axisbank.com/auctionretail.पहावी . मालमत्तांच्या तपासणीसाठी किंवा इतर कोणत्याही मदतीसाठी, इच्छुक बोलीदार **बँक अधिकारी श्री. संदीप आवारे** यांच्याशी कार्यालयीन वेळेत **सकाळी ९:३० ते संध्याकाळी ५:००** या वेळेत **७५८८०१३८९७** वर संपर्क साधू शकतात किंवा **ई-मेल आयडी :** Sandeep.aware@axisbank.com वर मेल करू शकतात. बोली हस्तांतरणीय नाही.

दिनांक : २३/०७/२०२४ **सही/-**
ठिकाण : नाशिक **(टिप : स्वैर भाषांतर तफावत पडल्यास मूळ इग्रजी ग्राह्य)** **अधिकृत अधिकारी, ॲक्सिस बँक लि.**

ईसीएल फायनान्स लिमिटेड Edelweiss Ideas create, values protect | ECL Finance Ltd.

नोंदणीकृत कार्यालय :५वा मजला, टॉवर ३, विंग बी, कोहिनूर सिटी मॉल, कोहिनूर सिटी, किरोल रोड, कुर्ला (प.), मुंबई-४०० ०७०
शाखा कार्यालयाचा पत्ता : ऑफिस नं. २०८-२१०, दुसरा मजला, काकडे बिझ आयकॉन, सीटीएस २६८७बी, गणेशखिंड रोड, भांबुर्डे, शिवाजीनगर, पुणे, महाराष्ट्र-४११ ०१६.

ई-लिलाव - वैधानिक १५ दिवसांची विक्री सूचना

दी सिक्युरिटायजेशन अॅण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल अॅसेट्स अॅण्ड एन्फोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अॅक्ट, २००२ आणि दी सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेन्ट) रुल्स, २००२ अंतर्गत ई-लिलावद्वारा विक्री.
सामान्यतः जनतेला आणि विशेषतः कर्जदाराला व हमीदाराला याद्वारे सूचना देण्यात येते की, कर्जरुपी देण्यांच्या वसुलीपर्यंत जोडलेल्या सारणीत नमूद केलेल्या रकमेच्या वसुलीकरिता **''जसे आहे जेथे आहे'', ''जसे आहे जे आहे'' आणि ''तेथे जे काही आहे''** तत्त्वावर निम्नोल्लेखित मालमत्ता विकण्यात येणार आहे. कर्जदार, सह-कर्जदार आणि हमीदार यांनी लाभ घेतलेल्या कर्जासाठी उक्त मालमत्ता **ईसीएल फायनान्स लिमिटेड** यांच्याकडे गहाण ठेवण्यात आली आहे. प्रतिभूत धनकोंकडे निम्नोल्लेखित प्रतिभूत मत्तेचा वास्तविक ताबा आहे.

अ. क्र.	कर्जदाराचे/ सह-कर्जदाराचे/ हमीदाराचे नाव	वसुलीची रक्कम	राखीव किंमत आणि इरठे	लिलावाची तारीख व वेळ	पाहणीची तारीख व वेळ	ताबा घेण्याची तारीख
१.	अतुल झुंबर कावडे (कर्जदार), तेजस्विनी अतुल कावडे (सह-कर्जदार)	**०९.०७.२०२४ रोजीनुसार रु. २,८८,३४,८४७/- (रुपये दोन कोटी अठ्ठाऐंशी लाख चौतीस हजार आठशे सत्तेचाळीस फक्त) + त्यावरील पुढील व्याज + एलएएन नं. एलएनएसकेईएफआय००००५९४७१ साठी विधिविषयक खर्च**	**रु. ५२,००,०००/-** (रुपये बावन्न लाख फक्त). **इसारा रक्कम ठेव : रु. ५,२०,०००/-** (रुपये पाच लाख वीस हजार फक्त)	**१३.०८.२०२४ रोजी सकाळी ११ ते दुपारी १२ वाजण्याच्या दरम्यान (५ मिनिटांच्या अमर्यादित स्वयं मुदतवाढींसह)**	**२६.०७.२०२४ रोजी सकाळी ११ ते दुपारी ३ वाजण्याच्या दरम्यान**	**१३.१०.२०२२**
प्रतिभूत मत्तेचे वर्णन : नाशिक महानगरपालिका हद्दीत, दसक, तालुका, जिल्हा नाशिक, नाशिक-४२२ १०१ येथे स्थित भूमापन क्र. २७सी/१ए/१/१/२ पैकी भूखंड क्र. ४ आणि भूखंड क्र. ५वर उभारलेल्या ''सिटी आर्केड'' म्हणून ज्ञात योजनेमधील तिसऱ्या मजल्यावरील शॉप नं. ६६ धारण करणाऱ्या (साइट ऑफिसनुसार क्र. १२), ८३.७६ चौ.मी. म्हणजेच ९०१.६० चौ.फूट क्षेत्रफळाची, शॉप नं